सहायक पूर्व परीक्षा - 2015

प्रश्नपुस्तिका क्रमांक परीक्षा दि: 5 मे 2015 Code : B06

BOOKLET No.

**A**

# प्रश्नपुस्तिका

## सामान्य क्षमता चाचणी

एकूण प्रश्न : 100

वेळ : 1 (एक) तास

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पृष्ठावर पहा

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

1. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक, 2014 बाबत खालीलपैकी कोणते विधान ***सत्य*** आहे ?
   (1) एकूण 286 महिला उमेदवारांनी निवडणूक लढवली.
   (2) एकूण 288 जागांपैकी फक्त 20 जागांवर महिला उमेदवार जिंकल्या.
   (3) महिलांचे विधानसभेतील प्रतिनिधित्व 8%.
   (4) लोकसंख्येनुसार राज्यातील सर्वात मोठा मतदार संघ ठाणे.

   Which of the following statements is ***true*** about the Maharashtra Legislative Assembly Election, 2014 ?
   (1) Total 286 women candidates contested the election.
   (2) Out of 288 seats, only 20 seats were won by the women candidates.
   (3) Women's representation in the Legislative Assembly is 8%.
   (4) On the basis of population, the largest constituency of the State is Thane.

---

2. महाराष्ट्राच्या नवीन सुधारित पथकर धोरणा (Toll policy) बाबत खालील विधाने विचारात घ्या :
   अ. अर्थसंकल्पातून पूर्ण करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या प्रकल्पांवर पथकर आकारला जाणार नाही.
   ब. 200 कोटी रुपयांखालील प्रकल्प खाजगीकरणांतर्गत करण्यात येणार नाही.
   क. फक्त 200 कोटी रुपयांपुढील खाजगी प्रकल्पासाठी पथकर आकारला जाईल.
   ड. एकाच रस्त्यावरील दोन पथकर नाक्यांमधील अंतर किमान 20 किमी असावे.

   वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
   (1) अ, ब आणि क
   (2) अ, क आणि ड
   (3) ब, क आणि ड
   (4) अ, ब, क आणि ड

   Consider the following statements about the New Toll Policy of Maharashtra :
   a. Road projects completed under the budget provision, toll shall not be charged.
   b. The projects below ₹ 200 crores are not to be done under privatisation.
   c. Only for the projects above ₹ 200 crores under privatisation the toll is to be charged.
   d. The distance between the two tolls on the same road shall be minimum 20 km.

   Which of the above statements are correct ?
   (1) a, b and c
   (2) a, c and d
   (3) b, c and d
   (4) a, b, c and d

3. 'प्रधानमंत्री जन-धन योजने' बाबत खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

अ. खातेदारास डेबिट कार्ड द्वारे एक लाख रुपयांचा अपघात विमा.

ब. खातेदारास अधिविकर्ष (overdraft) सवलत.

क. 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंद.

ड. पहिल्या पाच महिन्यात महिलाद्वारे उघडण्यांत आलेली खाती पुरुषांपेक्षा जास्त.

(1) अ, ब आणि ड (2) अ, ब आणि क

(3) ब, क आणि ड (4) अ, ब, क आणि ड

Which of the following statements regarding the 'Prime Minister Jan-Dhan Yojana' are correct ?

a. ₹ 1 lakh accident insurance to the account holder by debit card.

b. Overdraft facility to the account holder.

c. Registered in the 'Guinness Book of World Records'.

d. During the first five months the number of accounts opened by women were more than those opened by men.

(1) a, b and d (2) a, b and c

(3) b, c and d (4) a, b, c and d

---

4. वीरप्पा मोईली यांच्या बाबतीत खालील विधाने विचारात घ्या :

अ. ते त्यांच्या 'कोट्टा' (Kotta) या कादंबरीसाठी 'सरस्वती सम्मान' 2014 साठी निवडले गेले आहेत.

ब. ते कर्नाटकचे 1992 ते 1994 या काळात मुख्यमंत्री होते.

क. 'सरस्वती सम्मान' हा के.के. बिर्ला फाउंडेशन द्वारा 1991 मध्ये स्थापन केला गेला.

ड. ते प्रशासकीय सुधार आयोगाचे अध्यक्ष होते.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

(1) अ आणि ब (2) अ, ब आणि क

(3) ब, क आणि ड (4) अ, ब, क आणि ड

Consider the following statements in respect of Veerappa Moily :

a. He was selected for 'Saraswati Samman' 2014 for his novel 'Kotta'.

b. He was the Chief Minister of Karnataka from 1992 to 1994.

c. 'Saraswati Samman' was instituted by the K.K. Birla Foundation in 1991.

d. He was the Chairman of the Administrative Reforms Commission.

Which of the above statements are correct ?

(1) a and b (2) a, b and c

(3) b, c and d (4) a, b, c and d

5. ऑक्टोबर 2014 मध्ये श्री गणपतराव देशमुख का चर्चेत आले होते ?

(1) त्यांनी मॅगसेसे पारितोषिक जिंकले होते.

(2) त्यांनी अकरांव्यादा विधानसभा निवडणूक जिंकून इतिहास निर्माण केला.

(3) ते सर्वोदयी नेते आहेत.

(4) ते अण्णा हजारे यांचे समर्थक आहेत.

Why was Shri Ganpatrao Deshmukh in the news in October 2014 ?

(1) He won the Magsaysay Award.

(2) He created history by winning the Assembly election for the eleventh time.

(3) He is a Sarvodayee leader.

(4) He is a follower of Anna Hazare.

---

6. खालीलपैकी कोणते ***चुकीचे*** आहे ?

(1) पालघर हा महाराष्ट्राचा 36वा जिल्हा आहे.

(2) जिल्ह्यामध्ये पालघर, वसई, मोखाडा, जव्हार, वाडा, तलासरी, विक्रमगड आणि डहाणू हे आठ तालुके आहेत.

(3) जिल्ह्यात वसई-विरार, जव्हार, डहाणू आणि पालघर या चार नगरपरिषदा आहेत.

(4) वरील एकही नाही

Which of the following is ***false*** ?

(1) Palghar is the $36^{th}$ district of Maharashtra.

(2) There are eight tahsils i.e. Palghar, Vasai, Mokhada, Jawhar, Wada, Talasari, Vikramgad and Dahanu in the district.

(3) There are four Municipal Councils i.e. Vasai-Virar, Jawhar, Dahanu and Palghar in the district.

(4) None of the above

---

7. '*गुड गव्हर्नन्स : नेव्हर ऑन इंडियाज् रडार*' या पुस्तकाचे लेखक कोण आहेत ?

(1) शेखर गुप्ता (2) शिवराज पाटील

(3) किरण बेदी (4) माधव गोडबोले

Who is the author of the book '*Good Governance : Never on India's Radar*' ?

(1) Shekhar Gupta (2) Shivraj Patil

(3) Kiran Bedi (4) Madhav Godbole

8. 'बालकामगार कायद्या'त दुरुस्ती सुचविताना कॅबिनेटने पुढीलपैकी कोणती शिक्षा सुचविली ***नाही***?

(1) गुन्हा दखलपात्र केला जाणे.

(2) पहिल्या गुन्ह्याबद्दल 6 ते 24 महिन्यांचा तुरुंगवास किंवा ₹ 20,000 ते ₹ 50,000 दंड किंवा दोन्ही शिक्षा दिल्या जाणे.

(3) दुसऱ्या व नंतरच्या गुन्ह्याबद्दल 12 ते 36 महिने तुरुंगवासाची शिक्षा दिली जाणे.

(4) आई-वडिल किंवा पालकांना पहिल्या गुन्ह्याबद्दल ₹ 10,000 दंड केला जाणे.

Which of the following punishments is ***not*** proposed by the Cabinet in the Amendment Bill to the 'Child Labour Act'?

(1) The offence should be cognizable.

(2) For the first offence, imprisonment of 6 to 24 months or fine of ₹ 20,000 to ₹ 50,000, or both.

(3) In case of a second or subsequent offence, imprisonment of 12 to 36 months.

(4) Penalty of ₹ 10,000 for the parents or guardians for the first offence.

---

9. 'सितारा देवी' बाबत पुढीलपैकी कोणते सत्य ***नाही***?

(1) ती वाराणसीमधील कथाकार (कथा सांगणाऱ्या) कुटुंबातील होती.

(2) आपले वडिल सुखदेव महाराज, लच्छु महाराज आणि शंभू महाराज यांच्या तालमीत कत्थक नृत्याचे शिक्षण घेतले होते.

(3) रविंद्रनाथ टागोरांनी तीला 'नृत्य सम्राज्ञिनी' नाव दिले होते.

(4) तीला पद्म भूषण पुरस्कार मिळाला होता.

Which of the following was ***not*** true about 'Sitara Devi'?

(1) Came from a family of Kathakars (story tellers) from Varanasi.

(2) Was trained in Kathak under her father Sukhdev Maharaj, Lacchu Maharaj and Shambhu Maharaj.

(3) Was named 'Nritya Samragyini' (Empress of Dances), by Rabindranath Tagore.

(4) Was awarded with Padma Bhushan.

---

10. खालील विधाने विचारात घ्या :

अ. क्रिस्टिनो रोनाल्डोने दिनांक 5 एप्रिल, 2015 रोजी सामना खेळतांना पहिल्यादाच पाच गोल केले.

ब. रोनाल्डोच्या पाच गोलमध्ये, त्याच्या कारकिर्दीतील सर्वात वेगवान हॅट्-ट्रिक फक्त आठ मिनिटात आहे.

क. त्याच्या कारकिर्दीतील ही 41वी हॅट्-ट्रिक आहे.

(1) विधाने अ, ब बरोबर, क चूक

(2) विधाने ब, क बरोबर, अ चूक

(3) विधाने अ, क बरोबर, ब चूक

(4) सर्व विधाने बरोबर आहेत

Consider the following statements :

a. Cristiano Ronaldo scored five goals in a game for the first time while playing a match on April 5, 2015.

b. Ronaldo's five goals included the fastest hat-trick of his career in just eight minutes.

c. It was his $41^{st}$ career hat-trick.

(1) Statements a, b are correct, c is false

(2) Statements b, c are correct, a is false

(3) Statements a, c are correct, b is false

(4) All the statements are correct

---

11. तृतीय पंथीयांच्या हक्कांसंबंधीच्या विधेयका बाबतच्या खालील विधानांचा विचार करा :

अ. सामान्य नागरिकांप्रमाणे तृतीय पंथीयांना समान हक्क मिळावे हा विधेयकाचा उद्देश आहे.

ब. ते द्रमुक संसद सदस्य, तीरूची सिवा यांनी राज्यसभेत मांडले.

क. गेल्या 45 वर्षात राज्यसभेने संमत केलेले हे पहिले खाजगी विधेयक आहे.

वर दिलेल्या विधानांपैकी कोणते/कोणती बरोबर आहेत ?

(1) केवळ अ (2) केवळ अ आणि ब

(3) केवळ ब आणि क (4) अ, ब आणि क

Consider the following statements about a bill on 'Transgenders' Rights' :

a. The bill aims at equal rights for transgenders as common citizens.

b. It was moved by a DMK member of Parliament, Tiruchi Siva in Rajya Sabha.

c. It is the first private member's bill passed by Rajya Sabha in 45 years.

Which of the statements given above is/are correct ?

(1) a only (2) a and b only

(3) b and c only (4) a, b and c

12. 'अटल पेन्शन योजने' बाबत खालीलपैकी काय ***चुकीचे*** आहे ?

(1) सहभागी होण्याचे किमान वय 18 वर्षे

(2) सहभागी होण्याचे कमाल वय 40 वर्षे

(3) वर्गणीदाराने आपला हिस्सा भरण्याचा किमान कालावधी 20 वर्षे किंवा अधिक

(4) सुरुवात 1 जानेवारी, 2016 पासून

Which one of the following is ***false*** about 'Atal Pension Yojana' ?

(1) The minimum age of joining is 18 years

(2) The maximum age of joining is 40 years

(3) The minimum period of contribution by the subscriber would be 20 years or more

(4) Would be launched on 1$^{st}$ January, 2016

---

13. 'संसद आदर्श ग्राम योजने' बाबत खालीलपैकी कोणते विधान ***चुकीचे*** आहे ?

(1) संसद सभासद कोणत्याही प्रकारचे गाव दत्तक घेवू शकतात.

(2) अशा गावाची लोकसंख्या 5000 – 10000 च्या दरम्यान असावी.

(3) खासदार आपले स्वतःचे गाव दत्तक घेवू शकत नाहीत.

(4) 2016 पर्यंत एक गाव आणि 2019 पर्यंत आणखी दोन गांवे विकसित करावीत.

Which one of the following statements is ***not correct*** about the 'Sansad Adarsh Gram Yojana' ?

(1) Member of Parliament should adopt any kind of village.

(2) Village should have a population of around 5000 – 10000.

(3) MPs should not adopt their own village.

(4) One village to be developed by 2016 and two more by 2019.

---

14. मानवी दूध बँक 'जीवन धारा' चालविणारे पहिले राज्य कोणते ?

(1) पंजाब (2) मध्य प्रदेश

(3) राजस्थान (4) महाराष्ट्र

Which is the first State to run the human milk bank 'Jeevan Dhara' ?

(1) Punjab (2) Madhya Pradesh

(3) Rajasthan (4) Maharashtra

---

15. केन्द्रीय गृहमंत्रालयाने 14 एप्रिल, 2015 रोजी निर्णय घेवून प्रवासी 'visa-on-arrival' योजनेचे नाव बदलून __________ केले.

(1) e-spot-visa (2) e-arrival-visa

(3) e-tourist-visa (4) visa-at a-glance

The Union Home Ministry on April 14, 2015 decided to rename the tourist 'visa-on-arrival' scheme as __________ .

(1) e-spot-visa (2) e-arrival-visa

(3) e-tourist-visa (4) visa-at-a-glance

---

16. संविधान सभे बाबत खालीलपैकी कोणती विधाने ***सत्य*** आहेत ?

अ. ती प्रौढ मताधिकारावर आधारित नव्हती.

ब. ती प्रत्यक्ष निवडलेली संस्था होती.

क. ब्रिटिश भारतास 292 जागा देण्यात आल्या होत्या.

ड. ती विविध समित्यांद्वारे कार्य करीत असे.

(1) अ आणि ब (2) ब आणि क

(3) अ आणि ड (4) अ, ब, क आणि ड

Which of the following statements regarding the Constituent Assembly are ***true*** ?

a. It was not based on adult franchise.

b. It was a directly elected body.

c. 292 seats were allotted to the British India.

d. It worked through several committees.

(1) a and b (2) b and c

(3) a and d (4) a, b, c and d

17. खालील विधानांपैकी कोणते बरोबर ***नाही*** ?

(1) राज्याचा कार्यकारी अधिकार राज्यपालाच्या ठायी निहित असेल.

(2) मुख्यमंत्री राज्यपालाकडून नियुक्त केला जाईल आणि इतर मंत्री राज्यपालांकडून मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यानुसार नियुक्त केले जातील, आणि मुख्यमंत्र्याची मर्जी असे पर्यंत ते मंत्री अधिकारपदे धारण करतील.

(3) मंत्रिमंडळात मुख्यमंत्री तसेच मंत्री यांची एकूण संख्या, विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या पंधरा टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही.

(4) मुख्यमंत्री तसेच मंत्री यांची एकूण संख्या बारापेक्षा कमी असणार नाही.

Which one of the following statements is ***not*** correct ?

(1) The executive powers of the State shall be vested in the Governor.

(2) The Chief Minister shall be appointed by the Governor and the other Ministers shall be appointed by the Governor on the advice of the Chief Minister, and the Ministers shall hold office during the pleasure of the Chief Minister.

(3) The total number of Ministers, including the Chief Minister, shall not exceed fifteen percent of the total number of members of the Legislative Assembly.

(4) The number of Ministers, including the Chief Minister, shall not be less than twelve.

18. भारताच्या संघराज्यात्मक पद्धती बाबत खालीलपैकी कोणते विधान बरोबर ***नाही*** ?

(1) राज्यघटनेत 'संघराज्य' हा शब्दप्रयोग कोठेही केलेला नाही.

(2) संघराज्यातून फूटून बाहेर पडण्याचा अधिकार राज्यांना नाही.

(3) अखिल भारतीय सेवा संघराज्य तत्वाचा भंग करतात.

(4) राज्यपालाच्या नेमणूकीची पद्धत भारताने अमेरीकन पद्धती प्रमाणे स्विकारली आहे.

Which one of the following statements is ***not*** correct about the Federal System of India ?

(1) The term 'Federation' has not been used anywhere in the Constitution.

(2) The States have no right to secede from the federation.

(3) The All India Services violate the principle of federation.

(4) For the system of appointment of Governor, India has adopted the American system.

---

19. खालील विधाने विचारात घ्या :

अ. 42 व्या घटनादुरुस्तीनंतर मंत्रीमंडळाचा सल्ला राष्ट्रपतीवर बंधनकारक करण्यात आलेला आहे, परंतु अशी तरतूद राज्यपालाबाबत करण्यात आलेली नाही.

ब. मंत्र्यांनी राज्यपालास काही सल्ला दिला होता काय आणि असल्यास कोणता, या प्रश्नाची कोणत्याही न्यायालयात चौकशी करता येणार नाही.

(1) विधान अ बरोबर, ब चूक

(2) विधान अ चूक, ब बरोबर

(3) दोन्हीही विधाने चुकीची

(4) दोन्हीही विधाने बरोबर

Consider the following statements :

a. After the $42^{nd}$ Constitutional Amendment, ministerial advice has been made binding on the President, but no such provision has been made with respect to the Governor.

b. The question whether any, and if so what, advice was tendered by the Ministers to the Governor shall not be inquired into in any court.

(1) Statement a is correct, b is false

(2) Statement a is false, b is correct

(3) Both the statements are false

(4) Both the statements are correct

**20.** भारतीय नागरिकत्व हिरावून घेतल्याने नष्ट होते याबाबत खालीलपैकी कोणते विधान बरोबर ***नाही*** ?

(1) नागरिकाने लबाडीने नागरिकत्व मिळविले असेल.

(2) नागरिकाने भारतीय राज्यघटनेप्रती बेईमानी दाखविली.

(3) नागरिक सामान्यपणे सलग सात वर्षे भारताबाहेर राहिला.

(4) नागरिकास नोंदणीनंतर पाच वर्षांच्या आत अन्य देशात एक वर्षांचा तुरुंगवास झाला.

Which one of the following does ***not*** lead to compulsory termination of Indian citizenship ?

(1) The citizen has obtained citizenship by fraud.

(2) The citizen has shown disloyalty to the Constitution of India.

(3) The citizen has been ordinarily residing out of India for seven years continuously.

(4) The citizen has, within five years after registration, been imprisoned in any other country for a year.

---

**21.** निवडणूकांसंबंधी राज्यघटनेतील तरतूदी बाबत जोड्या लावा :

| | *कलम* | | *तरतूद* |
|---|---|---|---|
| अ. | 325 | I. | धर्म, जात, वंश वा लिंग यापैकी कोणत्याही आधारे व्यक्तिला मतदार म्हणून अपात्र ठरविता येणार नाही |
| ब. | 326 | II. | मतदार संघाचे परिसीमन |
| क. | 327 | III. | प्रौढ मताधिकाराद्वारे निवडणूका |
| ड. | 329 | IV. | मतदार यादी तयार करणे |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | I | III | IV | II |
| (2) | II | III | IV | I |
| (3) | I | II | III | IV |
| (4) | III | IV | I | II |

Match the pairs with regard to constitutional provisions relating to elections :

| | *Article* | | *Provision* |
|---|---|---|---|
| a. | 325 | I. | No person to be ineligible as elector on the grounds of religion, race, caste or sex |
| b. | 326 | II. | Delimitation of constituencies |
| c. | 327 | III. | Adult suffrage for elections |
| d. | 329 | IV. | Preparation of electoral roll |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | I | III | IV | II |
| (2) | II | III | IV | I |
| (3) | I | II | III | IV |
| (4) | III | IV | I | II |

**22.** महाधिवक्ता यांच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास जी व्यक्ती अर्हताप्राप्त असेल, अशा व्यक्तिस नेमता येईल.

(2) उच्च न्यायालयाचा विचार घेवून राज्यपाल नियुक्ति करतात.

(3) तो राज्याचा प्रथम कायदेविषयक अधिकारी (First Law Officer) होय.

(4) त्यास मतदानाच्या अधिकारासह राज्यविधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या कामकाजात हजर राहून भाषणाचा अधिकार आहे.

Which one of the following statements is correct about the Advocate General ?

(1) To be appointed, he must be qualified to be a Judge of the Supreme Court.

(2) Appointed by the Governor in consultation with the High Court.

(3) He is the First Law Officer of a State.

(4) He has the right to attend and speak in the proceedings of either of the Houses of the State Legislature with a right to vote.

---

**23.** पंचायत राज्याच्या क्षेत्रात 73व्या घटनादुरुस्तीद्वारे खालीलपैकी कोणती तरतूद सुचविलेली ***नाही*** ?

(1) महिला उमेदवारांना सर्व स्तरांवर एक-तृतीयांश आरक्षण.

(2) राज्याने वित्त आयोगाची स्थापना करावी.

(3) निर्वाचित पदाधिकाऱ्यांना जर दोनपेक्षा जास्त अपत्ये असतील, तर ते आपल्या पदावर राहण्यास अपात्र ठरतील.

(4) पंचायत राज संस्था जर विसर्जित झाल्या तर सहा महिन्यांच्या कालावधित निवडणूका झाल्या पाहिजेत.

Which one of the following was ***not*** proposed by the $73^{rd}$ Amendment in the area of Panchayat Raj ?

(1) One-third reservation for women candidates at all levels.

(2) The State will constitute Finance Commission.

(3) The elected functionaries will be disqualified to hold their office if they have more than two children.

(4) The election to be held with in six months if Panchayat Raj bodies are dissolved.

24. खालीलपैकी कोणत्या बाबींमध्ये राज्यघटनेत दुरुस्ती करणे किमान निम्म्यापेक्षा कमी नसलेल्या विधानसभेच्या मान्यतेने शक्य होते ?

अ. राष्ट्रपतीची निवडणूक
ब. घटक राज्यांचे संसदेतील प्रतिनिधीत्व
क. संविधानाच्या 7व्या परिशिष्टातील सूची
ड. राज्याची विधान परिषद रद्द करणे

(1) अ, ब आणि क (2) अ, ब आणि ड
(3) अ, क आणि ड (4) ब, क आणि ड

Which of the following are the matters on which a Constitutional Amendment is possible only with the ratification of the Legislative Assemblies of not less than one-half of the States ?

a. Election of the President
b. Representation of States in the Parliament
c. $7^{th}$ Schedule of the Constitution
d. Abolition of the Legislative Council of a State

(1) a, b and c (2) a, b and d
(3) a, c and d (4) b, c and d

---

25. खालीलपैकी कोणती विधाने बरोबर ***नाहीत*** ?

अ. ग्रामसेवकाची नियुक्ति मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून केली जाते.
ब. ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा सचिव असतो.
क. ग्रामसेवक हा ग्रामसभेचा सचिव म्हणूनही काम करतो.
ड. त्याचे वेतन ग्रामपंचायतीकडून दिले जाते.
ई. तो ग्रामपंचायतीचा नोकर असतो.

(1) अ आणि ई (2) अ, क आणि ड
(3) क आणि ड (4) ड आणि ई

Which of the following statements are ***not*** correct ?

a. Gramsevak is appointed by the Chief Executive Officer.
b. Gramsevak is a Secretary of the Gram Panchayat.
c. Gramsevak also works as a Secretary of the Gram Sabha.
d. His payment is made from the Gram Panchayat.
e. He is a servant of the Gram Panchayat.

(1) a and e (2) a, c and d
(3) c and d (4) d and e

26. रंगो बापूजी गुप्ते यांना कोणी विश्वासघाताने इंग्रजांच्या हवाली केले ?

अ. कृष्णाजी सदाशिव सिंदकर  ब. व्यंकटराव व बापूजी

क. रामजी सिरसाळ  ड. बाबासाहेब शिर्के

(1) अ आणि ब  (2) फक्त अ

(3) ब आणि क  (4) ड आणि अ

Who deceitfully handed over Rango Bapuji Gupte to the Britishers ?

a. Krishnaji Sadashiv Shindkar  b. Vyankatrao and Bapuji

c. Ramji Shirsal  d. Babasaheb Shirke

(1) a and b  (2) a only

(3) b and c  (4) d and a

---

27. सतीप्रथा बंद होण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंट कडे एक अर्ज केला गेला. त्यावर हिंदू लोकांच्या वतीने राजा राममोहन रॉय आणि खालीलपैकी कोणत्या व्यक्तीची सही होती ?

अ. बाळशास्त्री जांभेकर  ब. जगन्नाथ शंकरशेठ

क. पंडिता रमाबाई  ड. वि.रा. शिंदे

(1) अ आणि क  (2) फक्त ब

(3) फक्त क  (4) फक्त ड

An application was made to the British Parliament to stop the Sati tradition. On behalf of Hindu people, Raja Rammohan Roy and who else from the following had signed the application ?

a. Balshastri Jambhekar  b. Jagannath Shankarsheth

c. Pandita Ramabai  d. V.R. Shinde

(1) a and c  (2) b only

(3) c only  (4) d only

---

28. ब्रिटिश व भिल्ल यांच्यातील कोणत्या युद्धात कॅप्टन हेन्री मारला गेला ?

(1) अंबापाणी  (2) नांदगांव

(3) नांदुरशिंगोटे  (4) पेठ-सुरगाणा

Where was Captain Henry killed in a fight between Bhilla and the British ?

(1) Ambapani  (2) Nandgaon

(3) Nandurshingote  (4) Peth-Surgana

**29.** इंदापूर तालुक्यातील जमीन मोजणी खालीलपैकी कोणत्या सिद्धांतानुसार करण्यात आली ?

अ. रिकॉर्डोचा खंड सिद्धांत

ब. प्रिंगलचा खंड सिद्धांत

क. नॅशचा खंड सिद्धांत

ड. गोल्डस्मिथचा सिद्धांत

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) ब आणि क (4) फक्त ड

Which of the following theories was/were used to measure the land of Indapur Tahsil ?

a. Ricardo's Volume Theory

b. Pringal's Volume Theory

c. Nash's Volume Theory

d. Goldsmith's Theory

(1) a only (2) b only

(3) b and c (4) d only

---

**30.** 'स्वराज्य' म्हणजे स्वयंशासन असे लोकमान्य टिळकांना वाटत होते, तर 'स्वराज्य' म्हणजे परकीय राजवटीपासून पुर्ण मुक्तता असे कोणाला वाटत होते ?

अ. महात्मा गांधी

ब. अरविंद बाबू

क. सुभाष चंद्र बोस

ड. अरविंद घोष

(1) फक्त अ (2) फक्त ड

(3) ब आणि क (4) क आणि ड

According to Lokmanya Tilak, self-rule meant self-government, but according to whom did self-rule mean freedom from foreign rule ?

a. Mahatma Gandhi

b. Arvind Babu

c. Subhash Chandra Bose

d. Arvind Ghosh

(1) a only (2) d only

(3) b and c (4) c and d

**31.** लंडन प्रमाणेच पॅरिस येथेही भारतीय क्रांतिकारकांनी एक कार्यकेंद्र सुरु केले. त्याचे मुख्य सुत्रधार कोण होते ?

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | वि.दा. सावरकर | ब. | मादाम कामा |
| क. | सरदार सिंग राणा | ड. | शामजी कृष्ण वर्मा |

(1) अ आणि ब (2) क आणि ड
(3) फक्त क (4) फक्त ड

Like London, Indian revolutionaries also established an activity centre in Paris. Who was the main leader behind it ?

| | | | |
|---|---|---|---|
| a. | V.D. Savarkar | b. | Madam Kama |
| c. | Sardar Sing Rana | d. | Shyamji Krishna Varma |

(1) a and b (2) c and d
(3) c only (4) d only

---

**32.** "*दी इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया*" या प्रसिद्ध ग्रंथाचा लेखक कोण होता ?

(1) एच.एच. विल्सन (2) आर.सी. दत्त
(3) कार्टराईट (4) हारग्रीव्हज

Who wrote "*The Economic History of India*" ?

(1) H.H. Wilson (2) R.C. Dutt
(3) Cartright (4) Hargreaves

---

**33.** इ.स. 1889 च्या मुंबई इंडियन नॅशनल काँग्रेस अधिवेशनात महाराष्ट्राचे नेतृत्त्व करणाऱ्या दोन महिला प्रतिनिधी कोण होत्या ?

(1) दुर्गाबाई देशमुख आणि लिला रॉय
(2) पंडिता रमाबाई आणि काशीबाई कानिटकर
(3) गोदावरी परुळेकर आणि अनुसयाबाई काळे
(4) डॉ. ॲनी बेझंट आणि मादाम भिकाजी कामा

Who were the two women representatives from Maharashtra for Indian National Congress in 1889 held in Mumbai ?

(1) Durgabai Deshmukh and Lila Roy
(2) Pandita Ramabai and Kashibai Kanitkar
(3) Godavari Parulekar and Anusayabai Kale
(4) Dr. Annie Besant and Madam Bhikaji Kama

**34.** एल्फिन्स्टनने कॉर्नवॉलीस व मन्रो यांच्या प्रचलित महसूल पद्धती नाकारून तिसरी कोणती पद्धत स्विकारली ?

(1) प्रतवारी (2) रयतवारी

(3) कायमधारा (4) मौजेवार

Which third method of revenue collection did Elphinstone adopt after rejecting the methods of Cornwallis and Munro ?

(1) Pratwari (2) Ryotwari

(3) Kayamdhara (4) Maujewar

---

**35.** "सेवासदन" या संस्थेचा उद्देश काय होते ?

अ. हिंदू, मुस्लीम आणि पारशी स्त्रियांच्या शिक्षणाची सोय करणे

ब. त्यांना औषधपाण्याची मदत करणे

क. त्यांना गृहउद्योग शिकविणे

ड. विधवांच्या विवाहास चालना देणे

(1) अ, ब आणि क (2) फक्त अ

(3) ब आणि क (4) फक्त ड

What were the objectives of "Sevasadan" ?

a. To educate Hindu, Muslim and Parsi women

b. To help them with medicine

c. To teach them cottage industries

d. To encourage re-marriage of widows

(1) a, b and c (2) a only

(3) b and c (4) d only

---

**36.** डिसेंबर, 1930 च्या अलाहाबाद येथील मुस्लीम लीगच्या अधिवेशनात कोणाच्या अध्यक्षीय भाषणाने 'पाकिस्तानचा' पाया घातला गेला असे मानले जाते ?

(1) रहमत अली (2) इकबाल

(3) मो. जिन्ना (4) लॉर्ड कर्जन

Whose presidential speech in the Muslim League Session held in Allahabad in December, 1930, laid the foundation of 'Pakistan' ?

(1) Rahamat Ali (2) Iqbal

(3) M. Jinnah (4) Lord Curzon

37. कोणत्या महसुल पद्धतीत शेतकरी जमीन मालक बनले ?

(1) कायमधारा (2) जमीनदारी

(3) रयतवारी (4) मिरासदारी

In which land revenue system did peasants acquire ownership ?

(1) Kayamdhara (Permanent) (2) Zamindari

(3) Ryotwari (4) Mirasdari

---

38. 'ज्ञानोदय' मधील लिखाणास प्रत्युत्तर देण्यासाठी कोणती नियतकालिके सुरु झाली ?

अ. विचारलहरी ब. चंद्रिका

क. सद्धर्मदीपिका ड. इंदूप्रकाश

(1) फक्त अ (2) ब आणि क

(3) फक्त ड (4) अ, ब आणि क

Which periodicals were started to respond to the writings in 'Gyanoday' ?

a. Vicharlahari b. Chandrika

c. Saddharmadipika d. Induprakash

(1) a only (2) b and c

(3) d only (4) a, b and c

---

39. 'जातीय निवाडा' या नावाने इतिहासात प्रसिद्ध असलेला निवाडा रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी केव्हा जाहीर केला ?

(1) 16 ऑगस्ट, 1932 (2) 17 ऑगस्ट, 1932

(3) 18 ऑगस्ट, 1932 (4) 20 ऑगस्ट, 1932

When did Ramsay Macdonald declare the famous judgement in history known as 'Communal Award' ?

(1) 16 August, 1932 (2) 17 August, 1932

(3) 18 August, 1932 (4) 20 August, 1932

---

40. किसान सभेचे पहिले अधिवेशन कोठे व कधी भरले होते ?

(1) मुंबई, 1942 (2) ठाणे, 1945

(3) टिटवाळा, 1945 (4) पुणे, 1942

Where and when was the first conference of Kisan Sabha held ?

(1) Mumbai, 1942 (2) Thane, 1945

(3) Titwala, 1945 (4) Pune, 1942

---

**41.** काळी मृदा सुपिक असते, कारण

अ. ओलावा टिकवून धरण्याची क्षमता जास्त

ब. चुन्याचे प्रमाण अधिक

क. चिकण मातीचे प्रमाण जास्त

ड. पुरेशा प्रमाणात मॅग्नेशियम कार्बोनेट

(1) फक्त अ आणि ब

(2) फक्त ब आणि क

(3) फक्त अ, ब आणि क

(4) अ, ब, क आणि ड

Black soils are fertile because they have

a. More moisture holding capacity

b. More ratio of calcium

c. More ratio of alluvial soil

d. Sufficient magnesium carbonate

(1) a and b only

(2) b and c only

(3) a, b and c only

(4) a, b, c and d

---

**42.** तांबड्या मृदेसंदर्भातील विधाने पहा :

अ. ह्यूमसचे प्रमाण जास्त असते.

ब. सेंद्रीय द्रव्याचे प्रमाण कमी असते.

क. ॲल्यूमिनियम ऑक्साइड मुळे तांबडा रंग प्राप्त होतो.

(1) विधान अ आणि ब बरोबर आहेत

(2) विधान ब आणि क बरोबर आहेत

(3) विधान अ आणि ब बरोबर नाहीत

(4) विधान अ आणि क बरोबर नाहीत

Observe the statements regarding Red soil :

a. The percentage of humus is more.

b. The percentage of organic compounds is less.

c. The soil is red due to aluminium oxides.

(1) Statements a and b are correct

(2) Statements b and c are correct

(3) Statements a and b are incorrect

(4) Statements a and c are incorrect

43. भारताची दक्षिणोत्तर लांबी किती आहे ?

(1) 3214 कि.मी.

(2) 3014 कि.मी.

(3) 2933 कि.मी.

(4) 3312 कि.मी.

What is the length of India from the South to the North ?

(1) 3214 km

(2) 3014 km

(3) 2933 km

(4) 3312 km

---

44. दखन पठाराची उंची ________ मीटरच्या दरम्यान आहे.

(1) 200 – 300 (2) 300 – 900

(3) 100 – 300 (4) 500 – 700

The height of the Deccan Plateau is between _______ metres.

(1) 200 – 300 (2) 300 – 900

(3) 100 – 300 (4) 500 – 700

---

45. खालील विधाने पहा :

अ. बॉक्साइटपासून क्रोमाइटचे उत्पादन केले जाते.

ब. सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात बॉक्साइट सापडते.

क. पालघर जिल्ह्यातील तुंगार टेकड्यांमधे बॉक्साइटचे साठे आहेत.

(1) विधान अ आणि ब बरोबर आहेत

(2) विधान ब आणि क बरोबर आहेत

(3) विधान अ, ब आणि क बरोबर आहेत

(4) विधान अ, ब आणि क बरोबर नाहीत

Observe the following statements :

a. Chromite is produced from Bauxite.

b. Bauxite is found in Shirala tahsil of Sangli district.

c. Bauxite deposits are available in Tungar hills of Palghar district.

(1) Statements a and b are correct

(2) Statements b and c are correct

(3) Statements a, b and c are correct

(4) Statements a, b and c are incorrect

**46.** खालील विधाने पहा :

अ. कोंकण किनारपट्टीच्या प्रदेशात जांभा खडकाची पठारे आहेत.

ब. जांभा दगड हा बेसॉल्टच्या कायिक विदारणामुळे तयार होतो.

क. महाराष्ट्राच्या 80% भूप्रदेशावर क्रिटेशियस कालखंडातील लाव्हाचे थर आहेत.

(1) फक्त विधान अ बरोबर आहे

(2) फक्त विधान ब बरोबर नाही

(3) विधान अ आणि ब बरोबर आहेत

(4) विधान अ आणि क बरोबर नाहीत

Observe the following statements :

a. There are lateritic plateaus on the Konkan coastal belt.

b. Lateritic rock is produced due to mechanical weathering of Basalt.

c. The 80% land surface of Maharashtra is of cretaceous lava layers.

(1) Only statement a is correct

(2) Only statement b is incorrect

(3) Statements a and b are correct

(4) Statements a and c are incorrect

---

**47.** खालील विधाने पहा :

अ. उष्णकटिबंधीय सदाहरित वने सह्याद्रीच्या पश्चिमेकडील उतारावर आढळतात.

ब. उष्णकटिबंधीय सदाहरित वनातील वृक्षांची पाने रूंद असतात.

क. पळस, शिसम, खैर इ. वृक्ष प्रामुख्याने उष्णकटिबंधीय सदाहरित वनात आढळतात.

(1) फक्त विधान अ बरोबर आहे

(2) फक्त विधान ब बरोबर आहे

(3) फक्त विधान क बरोबर नाही

(4) विधान अ, ब आणि क बरोबर नाहीत

Observe the following statements :

a. Tropical evergreen forests are found on the western slopes of Sahyadri.

b. The trees have broad leaves in tropical evergreen forests.

c. The important trees found in the tropical evergreen forests are Palas, Shisham, Khair, etc.

(1) Only statement a is correct

(2) Only statement b is correct

(3) Only statement c is incorrect

(4) Statements a, b and c are incorrect

48. जोड्या लावा :

| | *जलसिंचन कालवा* | | *निर्मिती वर्ष* |
|---|---|---|---|
| अ. | कृष्णा कालवा | I. | 1875 |
| ब. | खडकवासला कालवा | II. | 1870 |
| क. | निरा डावा बँक कालवा | III. | 1885 |
| ड. | गिरणा कालवा | IV. | 1910 |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | IV | I | III |
| (2) | IV | I | III | II |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | II | I | III | IV |

Match the following :

| | *Irrigation canal* | | *Construction year* |
|---|---|---|---|
| a. | Krishna Canal | I. | 1875 |
| b. | Khadakwasla Canal | II. | 1870 |
| c. | Nira Left Bank Canal | III. | 1885 |
| d. | Girna Canal | IV. | 1910 |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | II | IV | I | III |
| (2) | IV | I | III | II |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | II | I | III | IV |

**49.** कोंकणची उत्तर व दक्षिण सीमा अनुक्रमे __________ यांनी निश्चित केली आहे.

(1) अचरा ते दमणगंगा नदी पर्यंत

(2) दमणगंगा ते तेरेखोल नदी पर्यंत

(3) तानसा ते गाड नदी पर्यंत

(4) वैतरणा ते तेरेखोल नदी पर्यंत

The North and South boundaries of the Konkan are demarcated by __________ .

(1) Achra to Damanganga rivers

(2) Damanganga to Terekhol rivers

(3) Tansa to Gad rivers

(4) Vaitarna to Terekhol rivers

---

**50.** अंजीर पीकाचे उत्पन्न जास्त प्रमाणात कोठे घेतले जाते ?

(1) सिंधुदुर्ग

(2) कणकवली

(3) राजेवाडी

(4) वसई

Where is fig (Anjeer) cultivation taken on a large scale ?

(1) Sindhudurg

(2) Kankavali

(3) Rajewadi

(4) Vasai

---

**51.** भारतातील एकूण बॉक्साईट उत्पादनापैकी किती टक्के उत्पादन बिहार राज्यात होते ?

(1) 20% (2) 32%

(3) 36% (4) 27%

How much percentage of bauxite is produced in Bihar State of the total production of India ?

(1) 20% (2) 32%

(3) 36% (4) 27%

52. महाराष्ट्राचा रेखवृत्तीय विस्तार __________ ते _________ आहे.

(1) 70° 5′ ते 80° 9′

(2) 71° 6′ ते 81° 8′

(3) 72° 6′ ते 80° 9′

(4) 72° 12′ ते 81° 8′

The longitudinal extension of Maharashtra is from ________ to __________ .

(1) 70° 5′ to 80° 9′

(2) 71° 6′ to 81° 8′

(3) 72° 6′ to 80° 9′

(4) 72° 12′ to 81° 8′

---

53. खालील विधाने पहा :

अ. नंदादेवी शिखराची उंची 7817 मी. आहे.

ब. हिमालयातील जोजीला खिंडीतून श्रीनगर ते लेह मार्ग जातो.

क. बद्रीनाथ शिखराची उंची गंगोत्री शिखरापेक्षा कमी आहे.

(1) फक्त विधान ब बरोबर आहे

(2) फक्त विधान क बरोबर आहे

(3) विधाने अ आणि ब बरोबर आहेत

(4) विधाने अ, ब आणि क बरोबर आहेत

Observe the following statements :

a. The height of the Nandadevi Peak is 7817 m.

b. The Shrinagar – Leh route passes through Zojila Pass in Himalayas.

c. The height of the Badrinath Peak is less than that of the Gangotri Peak.

(1) Only statement b is correct

(2) Only statement c is correct

(3) Statements a and b are correct

(4) Statements a, b and c are correct

**54.** खालील विधाने पहा :

अ. ठाणे जिल्ह्यातील अकलोली येथे गरम पाण्याचे झरे आहेत.

ब. गुहाघर पर्यटन क्षेत्र चिपळूण शहराच्या पुर्वेकडे आहे.

क. उरूळी कांचन येथे वैद्यकिय पर्यटन केंद्र आहे.

(1) फक्त विधान ब बरोबर आहे

(2) फक्त विधान क बरोबर आहे

(3) विधाने अ आणि ब बरोबर आहेत

(4) विधाने अ आणि क बरोबर आहेत

Observe the following statements :

a. There are hot springs at Akloli in Thane district.

b. Guhaghar tourist spot is located to the east of Chiplun.

c. There is a medical tourism centre at Uruli Kanchan.

(1) Only statement b is correct

(2) Only statement c is correct

(3) Statements a and b are correct

(4) Statements a and c are correct

---

**55.** खालील विधाने पहा :

अ. पिट हा उत्कृष्ट प्रकारचा कोळसा आहे.

ब. भारतातील 97% कोळशाचे उत्पादन टरशरी विभागातून होते.

क. बिहार मधील कर्णपुरा येथून कोळशाचे उत्पादन घेतले जाते.

(1) फक्त विधान अ बरोबर आहे

(2) फक्त विधाने क बरोबर आहे

(3) फक्त विधाने अ आणि क बरोबर नाहीत

(4) विधाने अ, ब आणि क बरोबर नाहीत

Observe the following statements :

a. Peat is a superior quality coal.

b. 97% coal production comes from tertiary sector in India.

c. Coal is found in Karnpura in Bihar.

(1) Only statement a is correct

(2) Only statement c is correct

(3) Only statements a and c are incorrect

(4) Statements a, b and c are incorrect

56. खालीलपैकी कोणत्या वर्षी स्थूल देशी उत्पादनातील वार्षिक वृद्धी दर सर्वाधिक (9·7%) होता ?

(1) 2005 – 06

(2) 2006 – 07

(3) 2007 – 08

(4) 2004 – 05

In which of the following years, was the annual growth rate of GDP the highest (9·7%) ?

(1) 2005 – 06

(2) 2006 – 07

(3) 2007 – 08

(4) 2004 – 05

---

57. रिजर्व्ह बँकेजवळ व्यवसायिक बँकांना ठेवावा लागणारा किमान रोख राखीव निधि म्हणजेच ?

(1) SLR (2) CRR

(3) Repo (4) OMO

The minimum cash reserve which the Commercial Banks have to keep with the RBI is known as

(1) SLR (2) CRR

(3) Repo (4) OMO

---

58. आर्थिक विकासासाठी वित्तपुरवठा आणि किंमतस्थैर्याचा प्रयत्न याविषयीचे धोरण म्हणजे

(1) आर्थिक धोरण

(2) विकास धोरण

(3) मौद्रिक धोरण

(4) राजकोषीय धोरण

The policy of adequate financing for economic growth and at the same time ensuring reasonable price stability is known as

(1) Economic Policy

(2) Development Policy

(3) Monetary Policy

(4) Fiscal Policy

**59.** जोड्या लावा :

| | *संज्ञा* | | *स्पष्टीकरण* |
|---|---|---|---|
| अ. | राजकोषीय तूट | I. | एकूण प्राप्तीपेक्षा एकूण खर्चाचे अधिक्य |
| ब. | अर्थसंकल्पीय तूट | II. | महसूली उत्पन्नापेक्षा महसूली खर्च अधिक असणे |
| क. | महसूली तूट | III. | एकूण खर्चाचा एकूण प्राप्तीवरील अधिकांश वजा कर्जे |
| ड. | प्राथमिक तूट | IV. | एकूण खर्चाचा एकूण प्राप्तीवरील अधिकांश वजा कर्जे व व्याजदेयता |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | III | I | II | IV |
| (2) | IV | III | II | I |
| (3) | I | III | II | IV |
| (4) | III | I | IV | II |

Match the following :

| | *Concept* | | *Explanation* |
|---|---|---|---|
| a. | Fiscal Deficit | I. | Total expenditure is more than total income |
| b. | Budgetary Deficit | II. | Revenue expenditure is more than revenue income |
| c. | Revenue Deficit | III. | Excess of total expenditure over total income – debts |
| d. | Primary Deficit | IV. | Excess of total expenditure over total income – debts and interest dues |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | III | I | II | IV |
| (2) | IV | III | II | I |
| (3) | I | III | II | IV |
| (4) | III | I | IV | II |

---

**60.** खालीलपैकी कशास 'नॅरो मनी' ही संज्ञा देता येईल ?

(1) लोकांजवळील रोख रक्कम + मागणी ठेवी
(2) लोकांजवळील रोख रक्कम + दागदागिने व अन्य जंगम मालमत्ता
(3) लोकांच्या मागणी ठेवी + दीर्घ मुदतीच्या ठेवी
(4) लोकांकडील विविध मुदतीच्या ठेवी + रोखे

Which of the following is called 'Narrow Money' ?

(1) Currency with the Public + Demand Deposits
(2) Cash with the Public + Jewellery and other Movable Property
(3) Public's Demand Deposits + Fixed Deposits
(4) All types of Deposits of Public + Securities

**61.** आपल्या पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांचे सुरवाती पासूनचे सर्वात महत्त्वाचे आर्थिक उद्दिष्ट म्हणजे

(1) समाजवादी समाज रचना निर्माण करणे

(2) आर्थिक विषमता कमी करणे

(3) विभागीय समतोल

(4) औद्योगिकरण

The most important economic objective of our first three Five Year Plans was

(1) To create socialistic pattern of society

(2) Reduction in economic inequality

(3) Regional balance

(4) Industrialisation

---

**62.** ग्रामीण व शहरी भागातील गरीब व निम्न उत्पन्नगटातील कुटुंबाच्या किमान एका व्यक्तिला वर्षभरात किमान 100 दिवस रोजगारा साठी कायदेशीर हमी खालीलपैकी कोणत्या योजनेमुळे प्राप्त झाली ?

(1) रोजगार हमी योजना 1971

(2) रोजगार हमी कायदा 2005

(3) जवाहर रोजगार योजना

(4) वरील कोणत्याही नाही

A legal guarantee for at least 100 days of employment to one person in every rural and urban poor and lower middle class family per year is provided by

(1) Employment Guarantee Scheme 1971

(2) Employment Guarantee Act 2005

(3) Jawahar Rojgar Yojana

(4) None of the above

---

**63.** भारतीय दारिद्रयाचा अंदाज आतापर्यंत __________ यांनी वर्तविलेले आहेत.

(1) दांडेकर आणि रथ

(2) डॉ. बर्धन आणि अहलूवालिया

(3) मिन्हास, पी.डी. ओझा

(4) वरील सर्व

The estimates of poverty in India have been provided by

(1) Dandekar and Rath

(2) Dr. Bardhan and Ahluwalia

(3) Minhas, P.D. Ojha

(4) All of the above

64. खालीलपैकी कोणत्या घटकांची जागा नवीन प्रत्यक्ष कर संहिता (DTC) घेणार आहे ?

(1) भारतातील उत्पन्न कर कायदा 1961 (2) भारतातील अप्रत्यक्ष कर संहिता

(3) भारतातील प्रत्यक्ष कर संहिता (4) वरीलपैकी कशाचीही नाही

Which of the following will now be replaced by the New Direct Tax Code (DTC) ?

(1) Income Tax Act of 1961 in India (2) Indirect Tax Code in India

(3) Direct Tax Code in India (4) None of the above

---

65. भारतीय अन्नधान्य उत्पादनांचा उतरता क्रम खालीलपैकी कोणता आहे, ते सांगा.

(1) गहू – तांदूळ – डाळी – भरड धान्ये

(2) तांदूळ – गहू – डाळी – भरड धान्ये

(3) गहू – तांदूळ – भरड धान्ये – डाळी

(4) तांदूळ – गहू – भरड धान्ये – डाळी

State the production of Indian foodgrains in their descending order.

(1) Wheat – rice – pulses – coarse cereals

(2) Rice – wheat – pulses – coarse cereals

(3) Wheat – rice – coarse cereals – pulses

(4) Rice – wheat – coarse cereals – pulses

---

66. वर्ष 2008 – 09 मध्ये भारताच्या एकूण निर्यातीमध्ये कोणत्या वस्तुभराचा हिस्सा सर्वाधिक दिसून आला ?

(1) शेतमाल (2) रासायनिक वस्तू

(3) पेट्रोलियम पदार्थ (4) अभियांत्रिकी वस्तू

Which group formed the major part of India's export to foreign countries during the year 2008 – 09 ?

(1) Agricultural products (2) Chemical products

(3) Petroleum products (4) Engineering products

---

67. भारतीय नाणेबाजारात परदेशी बँकांना मुक्त प्रवेश असावा अशी सूचना खालीलपैकी कोणत्या समितीने/आयोगाने केली ?

(1) नरसिंहम् (2) वेंकटरामन्

(3) नरीमन (4) रंगराजन

Which Committee/Commission from the following suggested that foreign banks should be given a free entry into the Indian money market ?

(1) Narsimham (2) Venkataraman

(3) Nariman (4) Rangarajan

**68.** NAMA म्हणजे

(1) Non-Agriculture Market Access

(2) Non-Agriculture Market Association

(3) Non-Agriculture Goods Market Access

(4) None of the above

NAMA means

(1) Non-Agriculture Market Access

(2) Non-Agriculture Market Association

(3) Non-Agriculture Goods Market Access

(4) None of the above

---

**69.** सन 2001 ते 2011 या दरम्यान भारतातील लोकसंख्येचा वृद्धीदर दर हजारी खालीलपैकी किती होता ?

(1) 24·7 (2) 23·9

(3) 21·5 (4) 17·64

During the years 2001 to 2011, the growth rate of population in India was ________ per thousand.

(1) 24·7 (2) 23·9

(3) 21·5 (4) 17·64

---

**70.** MRTP कायदा कोणत्या कायद्यामुळे रद्द झाला ?

(1) मक्तेदारी नियंत्रण कायदा

(2) स्पर्धा कायदा 2002

(3) व्यापार प्रॅक्टिस कायदा

(4) व्यापार नियंत्रण कायदा

MRTP Act was replaced by

(1) Monopoly Control Act

(2) Competition Act 2002

(3) Trade Practice Act

(4) Trade Regulation Act

71. उन्हाळ्यापेक्षा हिवाळा किंवा पावसाळ्यात ध्वनी लांब अंतराहून स्पष्टपणे ऐकू येतो, कारण

(1) हिवाळा किंवा पावसाळ्यात हवेतील आर्द्रता जास्त असते.
(2) हिवाळा किंवा पावसाळ्यात हवेचा दाब जास्त असतो.
(3) उन्हाळ्यात हवेचा दाब कमी असतो.
(4) हिवाळा किंवा पावसाळ्यात हवेतील आर्द्रता व हवेचा दाब जास्त असतो.

Sound can be heard distinctly at longer distances in winter or in rainy season rather than in summer because

(1) humidity in the air is greater in winter or in rainy season.
(2) air pressure is greater in winter or in rainy season.
(3) air pressure is less in summer.
(4) humidity and air pressure are greater in winter or in rainy season.

---

72. दोन समान रोधक प्रथम सरळ जोडणीमध्ये व नंतर समांतर जोडणीमध्ये V विद्युत दाबाच्या स्रोतास जोडले असल्यास.

खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

(1) दोन्ही जोडणीमध्ये समान पॉवर (शक्ती) खर्च होईल.
(2) सरळ जोडणीमध्ये समांतर जोडणी पेक्षा जास्त पॉवर (शक्ती) खर्च होईल.
(3) सरळ जोडणीमध्ये समांतर जोडणी पेक्षा कमी पॉवर (शक्ती) खर्च होईल.
(4) अपूर्ण माहिती.

Two identical resistances are connected in series first and then in parallel combination to a source of emf V.

Which of the following statements is correct ?

(1) Both the combinations consume the same power.
(2) Series combination consumes more power than the parallel combination.
(3) Series combination consumes less power than the parallel combination.
(4) Insufficient data.

---

73. अस्थिर अणु केंद्रकामधून अल्फा ($\alpha$) कण उत्सर्जित झाल्यानंतर कसे कमी होतात ?

(1) अणु अंक 2 नी व अणु वस्तुमानांक 4 नी.
(2) अणु अंक 4 नी व अणु वस्तुमानांक 2 नी.
(3) अणु अंक 4 नी व अणु वस्तुमानांक 4 नी.
(4) अणु अंक 2 नी व अणु वस्तुमानांक 2 नी.

The emission of an alpha ($\alpha$) particle from an unstable nucleus reduces

(1) the atomic number by 2 and mass number by 4.
(2) the atomic number by 4 and mass number by 2.
(3) the atomic number by 4 and mass number by 4.
(4) the atomic number by 2 and mass number by 2.

74. जर द्रावणाचा पी.एच. (pH) 1 पासून 4 पर्यंत वाढविल्यास त्यातील हैड्रोजन ($H^+$) ची तीव्रता

(1) कमी होते (2) वाढत जाते
(3) तसेच राहते (4) सांगता येत नाही

When the pH of a solution increases from 1 to 4 the concentration of $H^+$ ions

(1) Decreases (2) Increases
(3) Remains same (4) Cannot be stated

---

75. पृथ्वीच्या भुपृष्ठावर ॲल्युमिनिअम हा धातू शेकडा किती प्रमाणात आढळतो ?

(1) 20 ते 25% (2) 7 ते 8%
(3) 70 ते 75% (4) 50 ते 60%

The percentage of Aluminium in the Earth's crust is

(1) 20 to 25% (2) 7 to 8%
(3) 70 to 75% (4) 50 to 60%

---

76. खालीलपैकी कोणते मुलद्रव्य धातूसदृश्य आहे ?

(1) ॲल्युमिनिअम (Al) (2) सिलीकॉन (Si)
(3) लीड (Pb) (4) कॅल्शिअम (Ca)

Which of the following elements is said to be metalloid ?

(1) Aluminium (Al) (2) Silicon (Si)
(3) Lead (Pb) (4) Calcium (Ca)

---

77. सिलव्हर फिश सर्वसाधारणपणे कशा सोबत आढळतात ?

(1) खडक (2) शेवाळ
(3) इत्तर मत्स्यांसोबत (4) जुनी पुस्तके

The silver fishes commonly live among

(1) Rocks (2) Algae
(3) Other fishes (4) Old books

---

78. शेपूट आणि पाय असणारा हा उभयचर वर्गातील प्राणी होय

(1) सिसिलियन (2) भेक
(3) बेडूक (4) सलॅमँडर

The amphibian with tail and limbs is

(1) Caecilian (2) Toad
(3) Frog (4) Salamander

---

**79.** नैसर्गिक प्रसूतिसाठी लागणारे संप्रेरक कोणते ?

(1) ऑक्सीटोसीन (2) व्हासोप्रिसीन

(3) अॅड्रेनॅलीन (4) थायरोक्झीन

Which hormone is required for natural parturition ?

(1) Oxytocin (2) Vasopressin

(3) Adrenaline (4) Thyroxine

---

**80.** अतिशय परिणामकारक बुरशीनाशक बोर्डोमिश्रण हे ________ आणि ________ पासून तयार करतात.

(1) लाईम आणि सल्फर

(2) लाईम आणि सोडियम

(3) कॉपर सल्फेट आणि लाईम

(4) कॉपर सल्फेट आणि वेटेबल सल्फर

The most effective fungicide, Bordeaux mixture, is prepared from ______ and _____ .

(1) Lime and Sulphur

(2) Lime and Sodium

(3) Copper sulphate and Lime

(4) Copper sulphate and Wettable sulphur

---

**81.** __________ या जिवाणुंचा जैविकखत म्हणून वापर करतात.

(1) *रायझोबियम* (2) *व्हिब्रीओ*

(3) *बॅसिलस* (4) *स्पीरीलम*

__________ bacteria are used as biofertilizers.

(1) *Rhizobium* (2) *Vibrio*

(3) *Bacillus* (4) *Spirillum*

---

**82.** __________ आणि __________ यांना हवेतील नत्र स्थिरीकरणाची शक्ती आहे आणि त्यामुळे त्यांचा दलदलीत भात शेती मध्ये जमिनीची सुपिकता वाढवण्यासाठी उपयोग करतात.

(1) *क्लॅमॅडोमोनास* आणि *क्लोरेला* (2) *नॉसटॉक* आणि *अॅनाबीना*

(3) *पॅंडोरिना* आणि *यूडोरिना* (4) *युलोथ्रीक्स* आणि *अुलव्हा*

_________ and _________ have the power of fixing free nitrogen and hence are used in waterlogged rice fields to increase the soil fertility.

(1) *Chlamydomonas* and *Chlorella* (2) *Nostoc* and *Anabaena*

(3) *Pandorina* and *Eudorina* (4) *Ulothrix* and *Ulva*

**83.** एक ग्राम प्रथिनांमधून __________ ऊर्जा मिळते.

(1) 9 किलोकॅलरी

(2) 7 किलोकॅलरी

(3) 2 किलोकॅलरी

(4) 4 किलोकॅलरी

Protein can provide __________ energy per gram.

(1) 9 kcals

(2) 7 kcals

(3) 2 kcals

(4) 4 kcals

---

**84.** लिंगपरिवर्तित तांदुळ जो "सोनेरी तांदुळ" म्हणूनहि ओळखला जातो, त्यात मुख्यत्वे काय असते ?

(1) ॲन्थोसायनीन

(2) बिटा-कॅरोटीन

(3) अग्लूटीनीन

(4) हिमोपॉइटिन

The transgenic rice, popularly called as "Golden Rice" contains good quantities of

(1) Anthocyanins

(2) β-carotene

(3) Agglutinin

(4) Haemopoietin

---

**85.** मूत्रपिंडाद्वारे होणाऱ्या उत्सर्जन प्रक्रियेतील विविध क्रियांचा क्रम खालीलप्रमाणे असतो

(1) गाळणे, पुन:शोषण, स्रवणे (स्रावहोणे) आणि उत्सर्जन

(2) स्रवणे, गाळणे, पुन:शोषण आणि उत्सर्जन

(3) पुन:शोषण, गाळणे, स्रवणे आणि उत्सर्जन

(4) गाळणे, स्रवणे, पुन:शोषण आणि उत्सर्जन

The order of different steps involved in renal excretion is as follows :

(1) Filtration, Reabsorption, Secretion and Excretion


(2) Secretion, Filtration, Reabsorption and Excretion

(3) Reabsorption, Filtration, Secretion and Excretion

(4) Filtration, Secretion, Reabsorption and Excretion


---

**86.** जर उत्तरेला आणि पश्चिमेला जाण्याची परवानगी नसेल, तर A पासून B पर्यंत पोहोचण्यासाठी किती मार्ग उपलब्ध आहेत ?




(1) 7 (2) 10
(3) 11 (4) 12

If moving north and west is not permitted, then how many ways are available for reaching from A to B ?




(1) 7 (2) 10
(3) 11 (4) 12

---

**87.** आनंद बाळूच्या तुलनेत $2\frac{2}{3}$ पट वेगवान आहे. जर आनंदने बाळूला सुरुवातीला 80 m अंतर धावण्याची मुभा दिली, आणि दोघेही एकाच वेळेत अंतिम खूण ओलांडत असतील तर धावपट्टीची लांबी किती ?

(1) 140 m (2) 160 m
(3) 120 m (4) 128 m

Anand is $2\frac{2}{3}$ times as fast as Balu. If Anand gives Balu a start of 80 m, how long is the race track if both cross the mark at the same time ?

(1) 140 m (2) 160 m
(3) 120 m (4) 128 m

**88.** दिव्या, राजा, बानो आणि मिता यांचे सरासरी वय 5 वर्षे आहे. राजाचे वय 2 वर्षे आहे, बानो 6 वर्षांची आहे, आणि मिताचे वय 7 वर्षे आहे. दिव्या, तिची चुलत बहीण नयना, नयनाचा भाऊ निशी, तिची दुसरी चुलत बहीण प्रिती, तिचा जुळा भाऊ सौम्य आणि तिचा धाकटा भाऊ गुड्डू यांचे सरासरी वय 10 वर्षे आहे. निशीचे वय 18 वर्षे आहे, प्रिती 6 वर्षांची आहे, गुड्डू वर्षाचा आहे.
नयनाचे वय दर्शविणारा पर्याय निवडा.

(1) 14 वर्षे (2) 16 वर्षे

(3) 18 वर्षे (4) 24 वर्षे

Average age of Divya, Raja, Bano and Mita is 5 years. Raja's age is 2 years, Bano is 6 years old, and Mita is 7. Average age of Divya, her cousin Naina, Naina's brother Nishi, her other cousin Priti, her twin brother Soumya and her younger brother Guddu is 10 years. Nishi's age is 18 years, Priti's age is 6 years, Guddu is a year old.
Choose the option that indicates Naina's age.

(1) 14 years (2) 16 years

(3) 18 years (4) 24 years

---

**89.** 22, 36 आणि 66 यांनी निःशेष भाग जाणारा सर्वात लहान पूर्ण वर्ग निवडा.

(1) 3456 (2) 4356

(3) 5346 (4) 4536

Choose the least perfect square that is divisible by 22, 36 and 66.

(1) 3456 (2) 4356

(3) 5346 (4) 4536

---

**90.** अर्जित आणि अप्पू वर्तुळाकार मार्गावरून चालत आहेत. अर्जित ताशी 3 फेऱ्या वेगाने चालतो आणि अप्पू ताशी 2 फेऱ्या वेगाने चालतो. जर त्यांनी सकाळी 6·30 ला एकाच ठिकाणाहून विरुद्ध दिशांनी चालायला सुरुवात केली, तर सकाळी 8·00 वाजण्यापूर्वी ते किती वेळा एकमेकांना ओलांडतील ?

(1) 8 (2) 7

(3) 6 (4) 5

Arjit and Appu walk around a circular track. Arjit walks at a speed of 3 rounds per hour and Appu at a speed of 2 rounds per hour. If they start at 6·30 a.m. from the same point in opposite directions, how many times will they cross each other before 8·00 a.m. ?

(1) 8 (2) 7

(3) 6 (4) 5

**91.** एक तार वळवून तिला चौरस आकार दिल्यास 484 चौ. सेमी क्षेत्र बंदिस्त करते. त्याच तारेला वर्तुळाकार दिल्यास ती किती क्षेत्र बंदिस्त करेल ? $\left(\pi = \frac{22}{7} \text{ मानणें}\right)$

(1) 462 चौ. सेमी (2) 539 चौ. सेमी

(3) 616 चौ. सेमी (4) 693 चौ. सेमी

A wire when bent in the form of a square encloses an area of 484 sq.cm. What will be the enclosed area when the same wire is bent into the form of a circle ? $\left(\text{Take } \pi = \frac{22}{7}\right)$

(1) 462 sq. cm (2) 539 sq. cm

(3) 616 sq. cm (4) 693 sq. cm

---

**92.** नियाझ, रवी व आंद्रे हे तिघे मित्र आहेत. त्यांच्यापैकी एकजण नेहमीच खोटे बोलतो, एकजण नेहमीच खरे बोलतो, आणि एकजण एकदा खरे आणि एकदा खोटे याप्रमाणे बोलतो.

अन्वेषक म्हणून प्रत्येकाला वेग वेगळे गाठून प्रश्न विचारला. "तुमच्यापैकी नेहमीच खोटे बोलणारा कोण ?" तुम्हाला पुढील उत्तरे मिळाली :

रवी = नियाझ

नियाझ = आंद्रे

आंद्रे = मी

यावरून नेहमी खरे बोलणारी व्यक्ती शोधा.

(1) नियाझ

(2) आंद्रे

(3) रवी

(4) नाव निश्चित करण्यासाठी एखादा सूचक आवश्यक आहे

There are three friends, Niyaz, Ravi and Andre. One of them always tells lies, one always tells the truth, and one alternates in lying and telling the truth.

As an investigator you ask each of them separately, "Who among you always lies ?" You get the following answers :

Ravi : Niyaz.

Niyaz : Andre.

Andre : I do.

Now figure out the person who always tells the truth.


(1) Niyaz


(2) Andre

(3) Ravi

(4) Some clue is needed to figure out the name


**93.** पुढील प्रतिमा मालिकेतील प्रश्नचिन्हाच्या ठिकाणी ठेवण्यासाठी पर्याय निवडा.






(1) (2) (3) (4)

Select the option to replace question mark in the given image sequence.






(1) (2) (3) (4)


---

**94.** पृष्ठावरून पेन्सिल न उचलता आणि कोणत्याही रेषेवरून पेन्सिल दोनदा न फिरवता काढता येईल, अशी प्रतिमा निवडा.




(1) (2) (3) (4)

Select the image that could be drawn without taking the pencil off the surface and without drawing along a line twice.



(1) (2) (3) (4)


**95.** प्रश्नचिन्हासाठी पर्याय निवडा.






(1) (2) (3) (4)

Select an option for replacing the question mark.






(1) (2) (3) (4)

**96.** प्रश्नचिन्हाच्या ठिकाणी कोणती संख्या येईल ?

| | | |
|---|---|---|
| 0 | ? | 63 |
| 35 | 3 | 80 |
| 24 | 15 | 8 |

(1) 4 (2) 8
(3) 7 (4) 48

What number will replace the question mark ?

| | | |
|---|---|---|
| 0 | ? | 63 |
| 35 | 3 | 80 |
| 24 | 15 | 8 |

(1) 4 (2) 8
(3) 7 (4) 48

---

**97.** पुढीलपैकी एक व्यक्ती चुकीचे विधान करते. जर दोन व्यक्ती योग्य विधाने करत असतील, तर कोणत्या पक्षाने निवडणूक जिंकली ?

कमा = "A" किंवा "B" पैकी कोणत्याही पक्षाने निवडणूक जिंकली नाही.

नमा = "A" पक्षाने निवडणूक जिंकली.

पमा = "A" किंवा "B" पैकी एका पक्षाने निवडणूक जिंकली.

(1) A (2) B
(3) दोन्ही पक्ष (4) कोणताही पक्ष जिंकला नाही

One among the following persons makes a false statement. Which party will win the election, if two persons make a true statement ?

Kama = Neither party "A" nor "B" wins the election.


Nama = Party "A" wins the election.

Pama = Either party "A" or "B" wins the election.

(1) A (2) B
(3) Both parties (4) None of the parties wins

---

**98.** खाली दिलेल्या पाच प्रतिमांतील चार प्रतिमा विशिष्ट प्रकारे समान आहेत, या प्रकारात न बसणारी प्रतिमा शोधा.





(1) 2

(2) 3

(3) 4

(4) 5

Five images are given in the question. Four of these are alike in a certain way. Find the image that does not fit into the rest.





(1) 2

(2) 3

(3) 4

(4) 5


**99.** जर सोबतच्या आकृतीतील वरच्या त्रिकोणाचे क्षेत्रफळ 100% असेल, तर खालच्या त्रिकोणाचे क्षेत्रफळ किती टक्के आहे ?




(1) 120% (2) 130%

(3) 160% (4) 169%

If the area of the top triangle in the accompanying figure is 100%, then what is the area of the bottom triangle in percentage ?




(1) 120% (2) 130%

(3) 160% (4) 169%

**100.** A, B, C, D, E आणि F हे कुटुंब सदस्य आहेत. C ही इंजिनीअर व्यक्ती E चे वडील आहेत. A ही F ची आजी असून ती जिल्हाधिकारी होती. B ही व्यक्ती E चे आजोबा असून शेतकरी आहेत. कुटुंबात दोन विद्यार्थी असून ती भावंडे आहेत. एकजण कायद्याची पदवी मिळवण्यासाठी झटत आहे तर दुसरी व्यक्ती समाजकार्यातील पदवीसाठी झटत आहे. यात दोन विवाहित जोडपी आहेत. कुटुंबात एकजण शेतकरी, एकजण निवृत्त अधिकारी, एकजण इंजिनीअर आणि एकजण न्युरोसर्जन आहे.

D या व्यक्तीचा व्यवसाय दर्शविणारा पर्याय निवडा.

(1) कायद्याच्या पदवीसाठी झटणारा विद्यार्थी

(2) समाजकार्याच्या पदवीसाठी झटणारा विद्यार्थी

(3) न्युरोसर्जन

(4) D च्या व्यवसाया संदर्भातील वस्तुस्थिती पुरवलेली नाही

A, B, C, D, E and F are family members. C is an Engineer and is the father of E. A is the grandmother of F and was a Collector. B is the grandfather of E and is a Farmer. There are two students in the family who are siblings. One is pursuing law degree and the other one a degree in social work. There are two married couples. There is one Farmer, one retired Collector, one Engineer and one Neurosurgeon in the family. Choose the option that indicates the profession of D.

(1) Student pursuing law degree

(2) Student pursuing social work degree

(3) Neurosurgeon

(4) No information is provided relating to D's profession

# सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे.....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न

**प्र.क्र. 201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र.क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**